RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष ११, अंक ८० ] शनिवार, डिसेंबर १३, २०२५/अग्रहायण २२, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ४.००

**असाधारण क्रमांक १९१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ९ वा मजला, नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग,
मुंबई ४०० ००१ दिनांक १३ डिसेंबर, २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद अधिनियम, २००२.**

क्रमांक MEDD-14010/3/2025-MMD(Adhi)/1033487.—महाराष्ट्र व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषदेचे (यापुढे याचा उल्लेख "उक्त परिषद" असा करण्यात आला आहे.) दैनंदिन कामकाज सुरळितपणे पार पाडण्यासाठी महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद अधिनियम, २००२ (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) च्या कलम ३७ (२) (ख) नुसार डॉ. विवेक पाखमोडे, सहसंचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्याकडे दिनांक १३ मे, २०२५ च्या अधिसूचनेनुसार प्रशासक पदाच्या अतिरिक्त कार्यभारास दिनांक १५ मार्च, २०२५ पासून सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर मुदतवाढीचा कालावधी दिनांक १४ सप्टेंबर, २०२५ रोजी संपुष्टात येत होता.

राज्यात The National Commission for Allied and Healthcare Professions (NCAHP) Act, २०२१ या अधिनियमाची अंमलबजावणीच्या अनुषंगाने आता राज्यात Maharashtra State Allied and Healthcare Council व Maharashtra State Council for Allied and Healthcare Professions Rules, २०२४ अनुक्रमे दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ च्या अधिसूचनांनुसार अस्तित्वात आले आहेत. प्रस्तुत नवीन परिषद पूर्णपणे कार्यान्वित होण्यासाठी व कामकाज सुरू होण्यासाठी केंद्र शासनाच्या नियम व उपनियमांची आवश्यकता आहे. सदर नियम व उपनियम तयार करण्याची कार्यवाही केंद्र शासनाकडून सुरू आहे. Maharashtra State Allied and Healthcare Council पुर्णपणे कार्यान्वित होईपर्यंत व उक्त अधिनियम मागे घेईपर्यंत उक्त परिषदेचे कामकाज सुरू ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषदेचे दैनंदिन कामकाज सुरळितपणे पार पाडण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (२) (ख) नुसार डॉ. विवेक पाखमोडे, सहसंचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्याकडे दिनांक १३ मे, २०२५ च्या शासन आदेशानुसार सोपविण्यात आलेल्या प्रशासक पदाच्या अतिरिक्त कार्यभारास दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. सुवर्णा खरात,**
शासनाचे सह सचिव.

## MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT

G. T. Hospital Complex, 9th floor, New Mantralaya, Lokmanya Tilak Road,
Mumbai 400 001, Dated 13th December, 2025

*NOTIFICATION*

Maharashtra State Council for Occupational Therapy and Physiotherapy Act, 2002.

No. MEDD-14010/3/2025-MMD(Adhi)-1033487.—According to Section 37(2)(b) of the Maharashtra State Council for Occupational Therapy and Physiotherapy Act, 2002 (hereinafter referred to as "the said Act"), Dr. Vivek Pakhmode, Joint Director, Directorate of Medical Education and Research, Mumbai has been assigned the additional charge of the Administrator to carry out the daily work of the Maharashtra Council of Occupational Therapy and Physiotherapy (hereinafter referred to as "the said Council"), smoothly vide Government order dated 15th March 2024. Thenafter *vide* Govt Notification dated 13th May 2025 extension of additional charge up to 14th September 2025 was given to Dr. Pakhmode. The term of office of the said post was expiring on 14th March 2025.

In the context of the implementation of The National Commission for Allied and Healthcare Professions (NCAHP) Act, 2021, a Central Government Act, the Maharashtra State Allied and Healthcare Council and the Maharashtra State Council for Allied and Healthcare Professions Rules, 2024 have now come into existence in the state *vide* notifications dated 10th October 2024, respectively. Rules and sub-rules of the Central Government are required for the complete operationalization and functioning of this new Council. The process of formulating these rules and sub-rules is underway by the Central Government. It is necessary to continue the functioning of the said Council until the Maharashtra State Allied and Healthcare Council becomes fully operational and the said Act is withdrawn. Therefore, the extended additional charge of an Administrator assigned to Dr. Vivek Pakhmode, Joint Director, Directorate of Medical Education and Research, Mumbai, *vide* Government Order dated 13th May 2025, is hereby extended up to 31 December, 2025 as per clause 37 (2) (b) of the said Act for the smooth functioning of the daily affairs of the Maharashtra Council for Occupational Therapy and Physiotherapy.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Dr. SUVARNA KHARAT,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.